


# प्रीतिसंगम

www.pritisangam.com
सातारा-सांगली-कोल्हापूर-पुणे-सोलापूर




वर्ष २९ वे | अंक २०५ | पाने ४ | बुधवार | दि. ३ सप्टेंबर २०२५ | किंमत २ रूपये | R.N.I.No.MAHMAR./2001/10338 पोस्ट परवाना No./KRDDN/008/2024-2026 | फोन-२२७७२५

# संघर्षयोद्धा जिंकला

## मराठ्यांचा जल्लोष:मागण्या मान्य:जरांगेंचे उपोषण मागे

***मुंबई/प्रतिनिधी:-***

गेली पाच दिवस मुंबईत सुरूअसलेल्या मनोज जरांगे पाटील यांच्या उपोषणाला आज मोठे यश मिळाले. सरकारच्या उपसमितीने आठ पैकी सहा मागण्या मान्य करत हैद्राबाद गॅझेटियर लागू करण्याचा जी.आर. काढला आणि मराठा आरक्षण उपसमितीचे अध्यक्ष राधाकृष्ण विखे पाटील व सार्वजनिक बांधकाम मंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले यांच्या हातून लिंबू सरबत घेवून आपले उपोषण सोडले. आपण जिंकलो रे म्हणत जरांगेंनी उपोषणाची सांगता केली. दिवसभरामध्ये एकीकडे न्यायालयीन लढा तर दुसरीकडे सरकारची शिष्टाई या पेचामध्ये मराठ्यांचे आदोलन निर्णायक लढ्यावर असताना सरकारची शिष्टाई कामी आली. मनोज जरांगेंनी उपोषण सोडत असल्याची घोषण करत असतानाच, मराठा आंदोलकांनी गुलालाची उधळण करत जल्लोष साजरा केला. केवळ दोन वर्षे चार महिन्यामध्ये हा लढा जिंकण्यात संघर्षयोद्धा मनोज जरांगे पाटील यांना यश आले. त्यांनी या विजयानंतर आता मराठा समाजाला न्याय मिळाला, दिलेला शब्द सर्वांनी पाळावा असे सांगत ते संभाजीनगरकडे रवाना झाले.







मराठा आरक्षणाचा लढा यशस्वी झाल्यानंतर जल्लोष करताना आंदोलक.

मराठा आरक्षणासाठी मनोज जरांगे पाटील यांनी २९ ऑगस्टपासून सुरू केलेले बेमुदत उपोषण आज (दि. २) मागे घेतले. तत्पूर्वी, मंत्रीमंडळ उपसमितीचे अध्यक्ष राधाकृष्ण विखे-पाटील यांच्या नेतृत्वाखालील शिष्टमंडळाने जरांगे यांची भेट घेतली. त्यांना उपसमितीने घेतलेल्या निर्णयांची माहिती दिली. या निर्णयांबाबत जीआर काढावा अशी मागणी जरांगे यांनी केली. सरकारनेही या मागणीची पुर्तता केल्याने जरांगे यांनी सरकारचा जीआर स्विकारत आपले उपोषण मागे घेतल्याचे जाहीर केले. तसेच आज रात्री ९ वाजेपर्यंत मराठा आंदोलक मुंबई सोडतील अशी घोषणाही त्यांनी केली.

सरकारकडून आलेल्या शिष्टमंडळाने जरांगे पाटील यांना भेटीदरम्यान महत्त्वपूर्ण प्रस्ताव दिला, जो जरांगेंनी जाहीरपणे वाचून दाखवला. या शिष्टमंडळात मंत्री शिवेंद्रराजे भोसले, मंत्री माणिकराव कोकाटे, मंत्री जयकुमार गोरे, मंत्री उदय सामंत, मंत्री प्रताप सरनाईक यांचा समावेश होता. या आधी शिंदे समितीने जरांगे यांच्याशी चर्चा केली होती. नंतर यासंदर्भात मराठा उपसमितीशी चर्चा केली. यांचा समावेश होता. सरकारने हैदराबाद गॅझेट लागू करण्याच्या प्रस्तावाला उपसमितीची मान्यता असल्याचे जाहीर केले आणि तासाभरातच जी.आर. आणून दिला.

जरांग यांनी उपोषण सांडताच मराठा आंदोलकांनी गुलालाची उधळण करत, फटाक्याची आतषबाजी केली. मराठ्यांचा जल्लोष गगनात मावेत नव्हता. गाण्याच्या ठेक्यावर तरूणांनी धरला ठेका तर जरांगेंनी हा मराठ्यांसाठी सोन्याचा दिवस असून आपण जिंकलो आणि मुंबई काबिज करूण दाखवली. असे सांगितले मात्र त्याआधी न्यायालयाने दुपारी तीनपर्यंत रस्ते मोकळे करा असा निर्णय दिल्याने पोलीसांचा आणि आंदोलकांचा संघर्ष उभा राहिला होता. याचवेळी न्यायालयात सुनावणी सुरू होती तर आंदोलन स्थळी सरकारचे शिष्टमंडळ तोडगा काढत होते. त्यांच्या या शिष्टाईला यश आले. आणि जरांगे पाटलांनी लिंबू सरबत धेवून आपले उपोषण सोडले. त्यामुळे मंबईत झालेला तणाव पूर्णपणे निवळला.

### जरांगे यांच्या मान्य झालेल्या प्रमुख मागण्या

- ❁हैदराबाद गॅझेटिअर प्रमाणे कुणबी नोंदी करण्यात येईल
- ❁आंदोलकांवर दाखल झालेले सर्व गुन्हे या महिन्याभरात मागे घेण्यात येतील
- ❁सातारा गॅझेटीअरप्रमाणेही कुणबी नोंदी करण्यात येतील.
- ❁आरक्षणाच्या आंदोलनात बळी गेलेल्या वारसांना नोकरी देण्यात येतील
- ❁मराठा- कुणबी एक असल्याचा जी आर काढण्यात येईल

मुख्यमंत्री मा. देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री मा. एकनाथ शिंदे आणि मी स्वतः, आम्ही तिघांनी मिळून याबाबत सविस्तर चर्चा करून योग्य निर्णय होण्यासाठी सातत्याने प्रयत्न केले. शासनाच्या या ठोस व सकारात्मक भूमिकेला प्रतिसाद देत श्री. मनोज जरांगे पाटील यांनी आपले आंदोलन मागे घेण्याचा निर्णय घेतला आहे. त्यांच्या भावना आणि मराठा समाजाच्या अपेक्षांना न्याय देण्याचा प्रयत्न शासनाने केला आहे.

**-अजित पवार,उपमुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य**

## हैदराबाद गॅझेटची सरकारची सुरुवातीपासूनच तयारी होती

***मुंबई/प्रतिनिधी:-***



सरकारने मराठा समाजाच्या हिताचा निर्णय घेतला आहे. हैद्रबाद गॅझेट लागू करण्याची सरकारची सुरवातीपासून तयारी होती. पण मनोज जरांगेंची सरसकट आरक्षणाची मागणी कायद्याच्या कसोटीवर टिकणारी नव्हती.उच्च न्यायालयाचे आणि सर्वोच्च न्यायालयाचे निर्णय लक्षात घेता सरसकट आरक्षण देण्याचे निर्णय नव्हते. मात्र आरक्षणासंदर्भात सरकार आणि आंदोलकांमध्ये झालेल्या यशस्वी तोडग्यानंतर हे आंदोलन यशस्वीरित्या सुटले आणि जरांगेंच्या टिमने सहकार्य केले असे स्पष्ट मत राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केले.

सर्वप्रथम मला राधाकृष्ण विखे पाटील जे या मंत्रीमंडळ उपसमितीचे अध्यक्ष होते आणि मंत्रीमंडळ उपसमितीतील सर्व प्रमुख नेत्यांचे तसेच आमच्या मंत्र्यांचे अतिशय मनापासून अभिनंदन करायचे आहे. त्यांनी सातत्याने बसून एकेका गोष्टीचा अभ्यास करून मोठ्या प्रमाणावर चर्चा करून, हा मार्ग काढला. आता हा मार्ग निघाल्याने, जे मराठवाड्यात राहणारे आमचे मराठा समाजाचे लोक आहेत, कधी काळी त्यांच्या रक्त नात्यातील कुणाचाही कुणबी म्हणून उल्लेख झाला असेल, तर त्यांना आपल्या नियमाने ते प्रमाणपत्र (कुणबी प्रमाणपत्र) देता येते. तसेच, हैदराबाद गॅझिटियरमुळे अशा प्रकारच्या नोंदी शोधणे सोपे होणार आहे. त्यातून फॅमिली ट्री तयार करून, अशा प्रकारचे आरक्षण देता येणार आहे. म्हणजेच, ज्यांना अशा प्रकारचा पुरावा मिळेल, त्या सर्वांना हे आरक्षण मिळेल. मला असे वाटते की, त्यावर आम्ही संवैधानिक तोडगा काढू शकलो आहोत. एक असा तोडगा काढू शकलो आहोत की जो, न्यायालयातही टिकेल आणि त्यातून लोकाना फायदा होईल. म्हणून मी स्वतः देखील मंत्रिमंडळ उपसमितीच्या कामावर समाधानी आहे. त्यांनी उत्तम काम केले आहे. मी त्यांचे अभिनंदन करतो. या दरम्यान मुंबईकरांनाही थोडा त्रास सहन करावा लागला. त्यासाठी मी दिलगिरी व्यक्त करतो. पण मला वाटते की आपण एक चांगला निर्णय या ठिकाणी घेतला आहे, असेही फडणवीस म्हणाले.

## अल्टो कारची डंपरला धडक; एकजण ठार तीन जखमी

***विटा/प्रतिनिधी:-***

सांगली जिल्ह्यातील खानापूर तालुक्यातील विटा पोलीस ठाणे हद्दीत विटा कुंडल रोडवर चक्रधारी संघाजवळ एक डंपर रस्त्याच्या कडेला पंचर झाला होता. या डंपरवर पाठीमागे कोणताच दिशादर्शक फलक नव्हता ; याच डंपरमुळे एका दुचाकी चालकाचा अपघातात मृत्यू झाला होता. मात्र अपघात होऊनही हा डपर तिथेच घटनास्थळी होता. त्यानंतर केवळ बारा तासात काल सोमवारी रात्री नऊ वाजण्याच्या सुमारास आळसंद येथील मुल्ला कुटुंब विट्याकडे येत असताना मुल्ला कुटुंबाची अल्टो कारची याच डंपरला धडक बसल्याने भीषण अपघात घडला. या अपघातात आळसंद येथील असलम गुलाब मुल्ला याचा उपचारापूर्वीच मृत्यू झाला. तर मुल्ला कुटुंबातील तिघेजण जखमी झाले आहेत.

एकाच रोडवर एकाच ठिकाणी दोन अपघात झाल्याने विटा - कुंडल रोडवर



भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. अपघात घटनास्थळी नागरिकांतून वेगवेगळ्या चर्चेला उधाण आले होते. ज्याच्यामुळे अपघात झाला, तो डंपर तिथून हलवला नाही. या अपघातात असलम गुलाब मुल्ला याचा उपचारापूर्वीच मृत्यू झाला. मुल्ला कुटुंबातील अल्ताफ असलम मुल्ला, वहिदा अस्लम मुल्ला, सजीव मुजावर सर्वजण रा. आळसंद हे गंभीर जखमी झाले आहेत.

विटा नगरीचे माजी नगराध्यक्ष युवा नेते वैभव दादा पाटील हे खंबाळे येथे गणरायांच्या आरतीसाठी गेल्यानंतर आरती करून ते परत येत असताना त्यांना पुन्हा त्याच ठिकाणी अपघात झालेला निदर्शनास आला. तातडीने वैभव दादा पाटील यांनी अपघातग्रस्तांना मदतीचा

**पान ३ वर**

## मिरजेमध्ये भिंत कोसळून झालेल्या दुर्घटनेतील आणखी एकाचा मृत्यू

### मृतांची संख्या दोन ;दोषींवर गुन्हा दाखल करण्याची मागणी

***सांगली/प्रतिनिधी:-***

मिरज येथे बांधकाम सुरू असताना भिंत कोसळल्याने एका मजुराचा मृत्यू झाला होता. गंभीर जखमी असलेल्या दुसऱ्या मजुराचाही खासगी रुग्णालयात उपचाराच्या दरम्यान मृत्यू झाल्याने, या अपघातातील मृतांची संख्या दोनवर पोहोचली आहे.

किल्ला भागात खुशी पार्क-वन अपार्टमेंटचे बांधकाम सुरू असताना तटबंदीची भिंत कोसळून सात मजूर ढिगाऱ्याखाली दबले गेले. त्यापैकी एका मजुराचा घटनास्थळीच मृत्यू झाला होता. उर्वरित सहा जखमी झाले होते. यातून केदारी रायप्पा लिंगनूरे (वय ३५, रा. सुतुरी, ता. रायबाग) या मजुराचा खासगी रुग्णालयात उपचाराच्या दरम्यान सोमवारी मृत्यू झाल्याने मृत मजुरांची संख्या दोनवर पोहोचली आहे.

अपघातात भीमाप्पा सिद्धाप्पा मेटलकी (वय ४५, रा.ब्याकेरी, ता. रायबाग) या मजुराचा घटनास्थळीच मृत्यू झाला. केदारी लिंगनुरे या मजुराची प्रकृती गंभीर असल्यामुळे त्याला पुढील उपचारासाठी खासगी रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. बांधकामावर काम करणारे सर्व मजूर कर्नाटक येथीला रहिवासी आहेत. अन्य पाच जखमींची प्रकृती स्थिर असल्याचे सांगण्यात आले आहे. दुर्दैवी मृत्युप्रकरणी संबंधित ठेकेदार आणि अपार्टमेंट मालकाविरोधात पोलिस कारवाईची मागणी करत कामगार नेते डॉ. महेशकुमार कांबळे यांनी आंदोलनाचा इशारा दिला आहे. त्यांनी आरोप केला की दुर्घटनेत निरपराध मजुरांचा मृत्यू होऊन पाचा दिवस उलटले, तरी गुन्हा दाखल करण्यात टाळाटाळ सुरू आहे. दोन दिवसांत दोषींविरुद्ध गुन्हा दाखल न झाल्यास पोलिस अधीक्षक कार्यालयासमोर बेमुदत उपोषण करण्याचा इशारा कांबळे यांनी दिला आहे.

## श्रीगणेश..

मनो मन सिंहासन
विराजले श्रीगणेश
कसेवर्णावा उत्साह
महोत्सव भक्तावेश
टिळकांनाअभिप्रेत
लोकमान्य तो उद्देश
परदेशांत पोहोचला
परंपरागत रे दूरदेश
एक संघ व्हा सणात
महत्व जाणा विशेष
अन्यधर्मीयास सुध्दा
करु घ्यावा समावेश
वर्गणी गोळा करता
नसावाबळाचा त्वेष
खंडणीखोर फिरती
पेहरावी साधुंचावेश
सतर्क चोवीस तास
सेवेतखाकी गणवेश
स्वयंसेवक कष्ट घेती
तरी न थकव्याचीरेष
सन्माने निरोपे बाप्पा
जीवनहोईल अक्लेष
वाटो लवकर परतावे
संतुष्ट व्हावा विघ्नेश
योग्य स्थळी विसर्जन
न दिसावे भग्नावशेष
आठवणीतला उत्सव
सुखदायी सण विशेष

**- हेमंत मुसरीफ पुणे**
**९७३०३०६९९६**

# प्रीतिसंगमावर गणेशभक्तांची मांदियाळी

## घरगुती गौरी-गणपतींना भक्तिपूर्ण निरोप ;पर्यावरणपूरक विसर्जनास नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

***कराड/प्रतिनिधी:-***

गणेशोत्सव हा भक्तिभाव, आनंद आणि उत्साहाचे पर्व आहे. याच भावनेने कराड शहर व परिसरातील गणेशभक्तांनी मंगळवारी घरगुती गौरी-गणपतींना भक्तिपूर्ण वातावरणात निरोप दिला. गणपती बाप्पा मोरया पुढच्या वर्षी लवकर या या गजराने प्रीतिसंगम परिसर दुमदुमून गेला होता. कृष्णा-कोयना संगमावर लोटलेला गणेशभक्तांच्या गर्दीने प्रीतिसंगम परिसरात गणेशभक्तांची मांदियाळी पाहायला मिळाली.

यंदा गौराईंचे आगमन दोन दिवस उशिरा झाल्याने पारंपरिक घरगुती गौरी, गणपती विसर्जन पाचव्या दिवशीऐवजी सातव्या दिवशी पार पडले. घराघरातून निघालेल्या मिरवणुका, ढोल-ताशांचा गजर, टाळ-मृदंगाचा ताल, स्त्री-पुरुष-लहान मुले अशा सर्वच भक्तांच्या उपस्थितीने प्रीतिसंगम, कृष्णामाईचे वाळवंट फुलून गेले होते.

कराड नगरपालिकेने शासन आदेशानुसार यंदा श्रीचे विसर्जन पर्यावरणपूरक पद्धतीने करण्याचे आवाहन नागरिक, गणेशभक्तांना केले होते. त्यानुसार शहरातील प्रमुख चौक, वस्ती, तसेच प्रीतिसंगम



**प्रीतिसंगावर गणेश विसर्जनासाठी झालेली गर्दी.**



परिसर अशा तब्बल ४२ ठिकाणी कृत्रिम जलकुंडांची सोय करण्यात आली. श्रद्धावानांनी या जलकुंडांमध्ये आपल्या लाडक्या गौरी-गणपतींना निरोप देत पर्यावरणसंवर्धनाचा संदेश दिला. प्रीतिसंगमावरील कृष्णामाई मंदिरासमोरील जलकुंडांत सर्वाधिक विसर्जन झाले. यावेळी पालिकेच्या स्वागत कक्षात भक्तांची नोंद घेऊन त्यांना प्रमाणपत्रे देण्यात आली.

नदीप्रदूषण टाळण्यासाठी ठिकठिकाणी निर्माल्य संकलन कलश ठेवण्यात आले. भाविकांनीही याचा मनापासून स्वीकार केला. त्यामुळे उत्सवाला आध्यात्मिकतेसोबत पर्यावरणसंवर्धनाचा अधोरेखित संदेश मिळाला.

दरम्यान, कृष्णा नदीच्या वाळवंटाचे सपाटीकरण करून विसर्जनासाठी जागा तयार करण्यात आली होती. रात्री उशिरापर्यंत होणाऱ्या विसर्जनासाठी मोठे लाईट टॉवर उभारले होते. वाहतूक कोंडी टाळण्यासाठी पर्यायी रस्त्याची व्यवस्था करून नगरपालिका व वाहतूक पोलिसांनी संयुक्त नियोजन केले. त्यामुळे विसर्जनाचा सोहळा अपवाद वगळता सुरळीत पार पडला.



# पुढच्या वर्षी लवकर या..च्या जयघोषणात घरगुती गणेश मूर्तींचे विसर्जन

**सातारा/प्रतिनिधी:**
गणपती बाप्पा मोरया ..पुढच्या वर्षी लवकर या..च्या जयघोष यामध्ये आज घरगुती गणेश मूर्तींचे भावपूर्ण वातावरणात विसर्जन करण्यात आले गेले आठ दिवस मंगलमय वातावरणामध्ये घरोघरी मागील बुधवारी स्थापना करण्यात आलेल्या गणेश मूर्ती आज गणेशाच्या बहिणी ज्येष्ठाव कनिष्ठा गौरींचेही विधिवत सकाळी विसर्जन केल्यानंतर सायंकाळी गणेश भक्तांनी या गणेश मूर्ती पंचोपचार पूजा करून नदी तलाव कृत्रिम हौद आधी ठिकाणी भावपूर्ण वातावरणात विसर्जित केल्या पुढच्या वर्षी लवकर याच्या घोषात आबाल वृद्धांचे डोळे मात्र यावेळी पानावलेले दिसून येत होते.


गणपती बाप्पा मोरयाच्या जयघोषात विघ्नहर्ता गणरायाला निरोप देताना सातारकर गणेश भक्त.
छाया- अतुल देशपांडे ,सातारा.

विघ्नहर्ता गणरायाला निरोप देण्यासाठी सातारा शहरातील अनेक तलाव लगतच्या माहुली येथील कृष्णा वेण्णा हो नदी संगम परळी खोऱ्यातील उरमोडी नदीच्या बांधावर गणेशमूर्ती विसर्जनासाठी भाविकांनी रात्री उशिरापर्यंत गर्दी केली होती रविवारी घरोघरी ज्येष्ठ आणि कनिष्ठा गौरींचे आगमन झाल्यावर तीन दिवस मुक्कामाला आलेल्या या माहेरवाशींना आज भावपूर्ण निरोप दिल्यानंतर गणेश मूर्ती ही विसर्जित करण्यात आल्या रिमझिम पावसाच्या सरीमध्ये अनेक गणेश भक्तांनी ढोल ताशाच्या गजरात या घरगुती गणेश मूर्ती एकत्रितपणे विसर्जन स्थळी नेऊन या मूर्तींचे विसर्जन केले.

सातारा नगर परिषदेचे वतीने राजवाडा परिसरातील पाण्याचा तलाव, मंगळवार तळे परिसरात कृत्रिम हौद तसेच सोमवार पेठेतील फुटका तलाव ,गोडोली येथील तलावा नजीक कृत्रिम हौद तसेच सदर बाजार येथील दगडी शाळेजवळ विसर्जनासाठी कृत्रिम हौद तसेच निर्माल्य संकलित करण्यासाठी विशेष कलश ठेवण्यात आले होते.

अनेक गणेश भक्तांनी या उपक्रमात सहभाग घेऊन मूर्ती दान केल्या अंधश्रद्धा निर्मूलन समितीच्या वतीने सातारा जिल्ह्यामध्ये गणेश मूर्ती विसर्जित न करता पर्यावरण पूरक विसर्जन करण्यासाठी गणेश मूर्ती दान करा असे आवाहन केले होते. त्यालाही अनेक उपक्रमशील गणेश फक्त आणि प्रतिसाद दिला या गणेश मूर्ती नंतर एकत्रित करून योग्य पद्धतीने विसर्जित करण्यात येणार असल्याचे सांगण्यात आले.



# पाटण येथे सकल मराठा समाजाचा आनंदोत्सव

## छत्रपतींना अभिवादन, फटाक्यांची आतषबाजी, पेढे वाटून केला आनंद साजरा

**पाटण/प्रतिनिधी:-**
मराठा आरक्षण संदर्भात मुंबई येथे मराठा योध्दा मनोज जरांगे पाटील यांच्या आंदोलनाला आलेल्या यशाचा विजयोत्सव महाराष्ट्रात सर्वत्र साजरा होत असताना पाटण तालुक्यात देखील सकल मराठा समाजाच्या वतीने हा आनंदोत्सव ठिक ठिकाणी साजरा करण्यात आला. झेंडा चौक पाटण येथे छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेश पुष्पहार अर्पण करून फटाक्यांची आतिषबाजी करून एकमेकांना पेढे वाटून हा आनंद साजर केला.

मराठा योध्दा मनोज जरांगे पाटील यांचे मुंबई येथे पाचव्या दिवशी चालू असलेले आंदोलनाची गंभीर दखल घेत सरकारने मराठा - कुणबी आरक्षण संदर्भात सकारात्मक भूमिका घेत मराठा समाजाच्या आठ पैकी सहा मागण्या मान्य केल्या. तसा शासन निर्णय देखील तात्काळ दिला. हा मराठ्यांचा ऐतिहासिक निर्णय झाला. मराठा समाजाच्या मागण्या मान्य झाल्याने मराठा योध्दा मनोज जरांगे पाटील यांनी आंदोलनाच्या पाचव्या दिवशी आमरण उपोषण सोडले. याचा विजयोत्सव आनंद पाटण तालुक्यात ठिकठिकाणी मराठा बांधवांनी मोठ्या उत्साहात साजरा केला. पाटण शहरात झेंडा चौक येथे छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेश पुष्पहार अर्पण करून फटाक्यांची आतषबाजी करुन व एकमेकांना पेढे वाटून हा आनंदोत्सव साजरा केला.

## काटवली व भिलार परिसरात गणपती बाप्पांना

# पुढच्या वर्षी लवकर या..च्या गजरात भावपूर्ण निरोप

**पांचगणी/प्रतिनिधी:**
काटवली (ता जावळी) परिसरात आज गेली सहा दिवस विराजमान झालेले घरगुती गणेश बाप्पांना भक्तिमय वातावरणात आज निरोप देण्यात आला. शांततेच्या तसेच भावपूर्ण वातावरणात गणपती बाप्पांचे विसर्जन करण्यात आले.

ग्रामीण परिसरात बहुतांशी गणेश विसर्जन आज पार पडले. काही गावांमधील गणेश मंडळाच्या मूर्ती अनंत चतुर्थीच्या दिवशी विसर्जन होते. काटवली , गणेश पेठ, रुईघर, बेलोशी, रांजनी, वहागाव या गावातील विसर्जन कुडाळी नदीत होते. यंदा पावसाने हजेरी लावल्याने विसर्जन उत्साहात पार पडले.


काटवली : काटवली गावातील घरगुती गणेश मूर्तींचे कुडाळी नदीत विसर्जन करण्यासाठी गर्दी झाली होती. तर दुसऱ्या छाया चित्रात भिलारमधील मिरवणूक - (रविकांत बेलोशे )

काटवली गावातील घरगूती मूर्तींची घरीच आरती झाल्यावर विधिवतपणे एक एक करीत सर्व मूर्ती कुडाळी काठावर आल्या. व या ठिकाणी सार्वजनिक आरती झाल्यावर शांततेत विसर्जन पार पडले. याच पद्धतीने सर्व गावांमध्ये विसर्जन शांततेत पार पाडले. सायंकाळी सार्वजनिक मंडळांचे विसर्जन शांततेत पार पडले. परिसरातील सर्व गावांमध्ये बाप्पांना जड अंतःकरणाने निरोप देण्यात आला.

दरम्यान भिलार परिसरात ही गौरी आणि गणपती बाप्पाला भावपूर्ण वातावरणात निरोप देण्यात आला. गेले विविध धार्मिक कार्यक्रम, भजन आणि आरत्यांनी संपूर्ण गाव भक्तीमय झाले होते. आज सकाळी, आपापल्या घरांमध्ये गणपती बाप्पाची आरती आणि पूजा केल्यानंतर, ढोल-ताशांच्या गजरात आणि 'गणपती बाप्पा मोरया, पुढच्या वर्षी लवकर या' च्या जयघोषात मिरवणुकीला सुरुवात झाली. लहानांपासून ते मोठ्यांपर्यंत सर्वच जण या मिरवणुकीत सहभागी झाले होते. महिलांनी पारंपरिक वेशभूषेत फुगड्या खेळत आणि गाणी गात मिरवणुकीची शोभा वाढवली. पाझर तलावावर गणपती विसर्जनासाठी विशेष व्यवस्था करण्यात आली होती. यावर्षी प्रामुख्याने सर्व गावातील मंडळानी डी जे ला बाय बाय करीत पारंपरिक वाद्यांच्या गजरात म्हणजे ढोल, ताशा, बँड, च्या गजरात मिरवणुका शांततेत पार पडल्या.

# फलटण येथील मराठा समाजाचा आझाद मैदानावर विज्योत्सव साजरा

**फलटण प्रतिनिधी:-**
संघर्ष योद्धा मनोज दादा जरांगे पाटील यांनी राज्य सरकारला सांगितले होते,आता आरक्षण घेतल्याशिवाय माघार घेणार नाही त्यामुळे तब्बल पाच मागण्या पूर्ण झाल्या असून सातारा गॅझेट व औंध संस्थांच्या नोंदी बाबत थोडी मुदत दिली आहे.त्यामुळे सातारा गॅझेट मध्ये स्पष्ट उल्लेख आहे की कुणबी व मराठा एकच त्यामुळे पश्चिम महाराष्ट्रातील मराठा समाजाला आरक्षण मिळणार आहे दरम्यान याबाबत जीआर काढण्यात आला असल्याचे स्पष्ट होताच फलटण तालुक्यातील मराठासेवकांनी आझाद मैदान मुंबई येथे या आरक्षणाचा विजयोत्सव साजरा केला.


मुंबई - फलटण येथील मराठा समाजाचा आझाद मैदानावर विज्योत्सव

गेली पाच दिवस संघर्ष योद्धा मनोज दादा जरांगे पाटील हे आझाद मैदानावर उपोषणास बसले होते त्यांनी आपल्या समाजातील लोकांची भावना राज्य सरकारकडे मांडली होती त्यास दोन दिवस राज्य सरकार व उपसमिती कडून कोणताही प्रतिसाद मिळत नसल्याने पाहून लाखो मराठे मुंबईकडे रवाना झाले त्यामध्ये फलटण तालुक्यातील हजारो मराठा बांधव मुंबईच्या लढ्यासाठी गेले व या लढ्यात सहभागी झाले.

संघर्ष योद्धा मनोज दादा जरांगे पाटील यांनी स्पष्ट केले की मी सोमवार दि.१ सप्टेंबर पासून पाण्याचा घोटही घेणार नाही असा पवित्रा घेतला अन् राज्य सरकार बैठका वर बैठका घेऊ लागले व आज मंगळवारी उपसमितीचे अध्यक्ष मंत्री राधाकृष्ण विखे पाटील व सातारा जिल्ह्यातील मंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले,जयकुमार गोरे,मंत्री कोकाटे सावंत यांनी मनोज जरांगे पाटील यांच्या मागण्या मान्य केल्या व तसा जीआर काढण्यात आला व अनेक मागण्या मान्य करण्यात आल्या व तिथे तब्बल पाच दिवसांपासून तळ ठोकलेल्या फलटण तालुक्यातील मराठा बांधवांनी गुलाल उधळला व एकच जल्लोष केला यावेळी हजारो मराठा बांधव यांनी छत्रपती शिवाजी महाराज की जय व एक मराठा लाख मराठा घोषणेने आझाद मैदान दणाणून सोडले.

# इस्लामपुरात प्रभाग रचनेवर १५ हरकती

## विजय कुंभार : नागरिक, नेत्यांकडून हरकती दाखल

**इस्लामपूर/प्रतिनिधी:**
इस्लामपूर येथील नगरपरिषद निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर नवीन प्रभाग रचना जाहीर झाल्यानंतर नागरिक व स्थानिक नेत्यांकडून हरकती दाखल करण्यात आल्या आहेत.

प्रारूप प्रभाग रचना सुरू करताना उत्तरेकडून ईशान्य (उत्तर-पूर्व) त्यानंतर पूर्व दिशेकडे येऊन पूर्वेकडून पश्चिमेकडे करण्याची तरतूद आहे. तथापि नव्याने केलेल्या प्रभाग रचनेमध्ये, प्रभाग रचना सुरू करताना इस्लामपूर-बहे व इस्लामपूर-ताकारी हे मुख्य दोन जिल्हा मार्ग असताना उत्तरेकडील बाजू जाणीवपूर्वक पश्चिम बाजूस सरकली आहे. सध्याची प्रारूप प्रभाग रचना रद्द करून नव्याने प्रभाग रचना करावी, अशी मागणी माजी विरोधी पक्षनेते विजय कुंभार यांनी केली.

विजय कुंभार म्हणाले, हनुमाननगर, नालबंद कॉलनी व लगतच्या उपनगरांची जाणीवपूर्वक दोन ते तीन प्रभागांमध्ये विभागणी केली आहे. त्यामुळे प्रभाग रचना सुरू करताना भौगोलिक सलगता राहणार नाही व त्याचे उल्लंघन होणार नाही, याची दक्षता घेतली गेली नाही. त्यामुळे उपनगरांची वेगवेगळ्या प्रभागांत विभागणी झाली आहे. हनुमान नगर, मंत्री कॉलनी, क्रांतिसिंह नाना पाटील नगर, महादेव नगर, शिवनगर टकलाई नगर, इंदिरा कॉलनी, मोरे कॉलनी, विनायक नगर, अक्षर कॉलनी यांची भौगोलिक सलगता राहिली नाही. निवडणूक आयोगाच्या मार्गदर्शक सूचनांचे उल्लंघन केले आहे. प्रभाग क्रमांक १, ३, ४, ८, ११, १२, १३, १४, १५ तयार करताना नैसर्गिक मर्यादा विचारात घेतल्याचे दिसून येत नाही. मुख्य मोठ्या रस्त्याच्या सीमा विचारात न घेता जाणीवपूर्वक नैसर्गिक मर्यादा दुर्लक्षित केली आहे. प्रभाग क्रमांक ११, १२ मुख्यत्वे १३ व १४, १५ हे प्रभाग निश्चित करताना प्रभागाची लांबी अंदाजे चार किलोमीटर इतकी ठेवली आहे. वास्तविक, निवडणूक आयोगाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार मोठ्या रस्त्यांचा विचार केला तर पेठ ते सांगली रस्त्याच्या उत्तर व




दक्षिणेकडील उपनगरांमधील (वस्ती) नागरिकांसाठी प्रभागातील दळणवळण सहज शक्य झाले असते. आता दळणवळण, सुख-सोयी उपलब्ध करून देणे अडचणीचे व गैरसोयीचे होणार आहे.

प्रभाग क्रमांक ४, ५ व १३ तयार करताना मार्गदर्शक सूचनांचा विचार न घेतल्याने बहुतांश प्राथमिक शाळा व लगतची मैदाने त्या प्रभागात ठेवण्यात आली नाहीत. निवडणूक आयोगाने प्रभाग रचनेतील त्रुटी, दोषांचा गांभीर्यपूर्वक विचार केला पाहिजे. प्रारूप प्रभाग रचना रद्द होऊन नव्याने प्रभाग रचना तयार करून ती नागरिकांच्या माहितीसाठी प्रसिद्ध करावी, अशी मागणी कुंभार यांनी केली आहे.

# सांगली महापालिकेची प्रारुप प्रभाग रचना आज जाहीर होणार

**सांगली / प्रतिनिधी:-**
सांगली मिरज आणि कुपवाड शहर महापालिकेच्या निवडणुकीसाठीची प्रारुप प्रभाग रचना बुधवार दि. ३ सप्टेंबर रोजी जाहीर होणार आहे. या प्रारुप रचनेत मागील २०१८ च्या निवडणुकीनुसारच प्रभाग रचना असणार की त्यात बदल होणार याची इच्छुकांसह सर्वच राजकीय पक्षात मोठी उत्सुकता आहे.

प्रारुप प्रभाग रचना प्रसिद्ध करणे व त्यावर हरकती सूचना मागविण्याची मुदत ३ ते ८ सप्टेंबर आहे. सूचना, हरकतींवर ९ ते १८ सप्टेंबर या कालावधीत सुनावणी होणार आहे. जिल्हाधिकारी अथवा त्यांनी प्राधिकृत केलेला अधिकारी ही सुनावणी घेणार असून त्यानंतर अंतिम प्रभाग रचना १९ ते २२ सप्टेंबर अखेर नगरविकास विभागाला सादर होणार आहे. निवडणूक आयोगाच्या मान्यतेनंतर अंतिम प्रभाग रचना ९ ते १३ ऑक्टोबर या कालावधीत प्रसिद्ध होणार आहे. सांगली महापालिकेची निवडणूक दिवाळीनंतर घोषित होण्याची शक्यता आहे. राज्य शासनाने या निवडणुकीसाठी प्रारुप प्रभाग रचना तयार करण्याचे काम सुरु केले आहे.

शासनाच्या आदेशानंतर महापालिका प्रशासनाने अत्यंत गोपनीयपणे प्रारुप प्रभाग रचना तयार करुन ती शासनाच्या नगरविकास विभागाला सादर केली आहे. महापालिकेची २०२५

महापालिकेची निवडणूक ही २०१८ च्या निवडणुकीप्रमाणे ४ सदस्यीय प्रभागानुसार आणि २७ टक्के ओबीसी आरक्षणानुसार होईल. त्यामुळे २०१८ च्या निवडणुकीतील प्रभाग रचनाच २०२५ च्या निवडणुकीत राहील. निवडून द्यायच्या सदस्यांची संख्याही ७८ इतकीच असेल अशी शक्यता आहे. महापालिका प्रशासनाने यात नेमके काय बदल केले आहेत की, मागील रचनाच कायम ठेवली आहे.

महापालिकेच्या निवडणुकीसाठी प्रारूप प्रभाग रचना तयार करण्याचे काम जूनमध्ये सुरू झाले. प्रारूप प्रभाग रचनेचा प्रस्ताव दि. १२ ऑगस्ट रोजी नगरविकास विभागाला सादर झाला. तिथून तो राज्य निवडणूक आयोगाला सादर झाला. त्याला मान्यता दिल्यानंतर प्रारुप प्रभाग रचना प्रसिद्ध करणे व त्यावर सूचना, हरकती मागवण्याचा कालावधी दि. ३ सप्टेंबर ते ८ सप्टेंबर आहे. प्रारुप प्रभाग रचना प्रसिद्धीसाठी अवघे दोन दिवस उरले आहेत.

# तांबवे गावाला स्वातंत्र्य सैनिकांचा इतिहास

## जिल्हाधिकारी संतोष पाटील

**तांबवे/प्रतिनिधी : -**
स्वातंत्र्य सैनिकांचा इतिहास तांबवे गावाला आहे. या गावाने देशाला नेतृत्व घडवण्याचा मान मिळवला आहे. या भूमीला स्वर्गीय यशवंतराव चव्हाण, माजी राष्ट्रपती डॉ. राजेंद्र प्रसाद यांचे पाय लागले आहेत, असे प्रतिपादन जिल्हाधिकारी संतोष पाटील यांनी केले. तांबवे, ता. कराड येथील संगम गणेश मंडळाने आयोजित केलेल्या हिंदू-मुस्लिम एकत्रित आरती सोहळा व गुणवंत विद्यार्थी सत्कार कार्यक्रमात ते बोलत होते. यावेळी अप्पर पोलीस अधीक्षक वैशाली कडूकर, प्रांताधिकारी अतुल म्हेत्रे, पोलीस उप अधीक्षक राजश्री पाटील, आरटीओ चैतन्य कणसे, कराड ग्रामीण पोलीस निरीक्षक महेंद्र जगताप, सरपंच नीता पवार, उपसरपंच ॲड. विजयसिंह पाटील, सचिव हेमंत पवार, डॉ.एस.एन. संदे यांची उपस्थिती होती.



जिल्हाधिकारी पाटील म्हणाले, तांबवे गावात सर्व नागरिकांना एकत्रित घेऊन गणेशोत्सव साजरा करून जातीय सलोखा राखला जातो, हे या गावचं वैशिष्ट्य आहे. जिल्ह्यामध्ये घरगुती व सार्वजनिक गणपतीचे कृत्रिम तलावात विसर्जन करून प्रदूषण टाळावे, मूर्ती दान कराव्यात, असे अहवान त्यांनी केले.

यावेळी पोलीस उपअधीक्षक राजश्री पाटील म्हणाल्या, पालकांमध्ये सकारात्मक दृष्टिकोन निर्माण होण्यासाठी गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार सोहळा आयोजित करून संगम गणेश मंडळांना समाजासमोर एक आदर्श निर्माण केला आहे. कार्यक्रमाचे प्रास्ताविक व स्वागत ॲड. विजयसिंह पाटील, सुत्रसंचलन करून हेमंत पवार यांनी आभार मानले.

# अकरावी ऑनलाईन प्रवेश प्रक्रियेत गोंधळ

## अशोकराव थोरात; हजारो विद्यार्थी शिक्षणापासून वंचित, शासनाने तातडीने लक्ष देणे अत्यावश्यक

**कराड/प्रतिनिधी : -**
इयत्ता अकरावीचा निकाल १३ मे २०२५ रोजी जाहीर झाल्यानंतर २६ मेपासून शासनाने ११ वी ऑनलाईन प्रवेश प्रक्रिया सुरू केली. परंतु, आज २ सप्टेंबरपर्यंत अनेक फेऱ्या पूर्ण होऊनही राज्यातील ज्युनिअर कॉलेजेसमध्ये प्रवेशप्रक्रिया रखडलेली आहे. परिणामी, अकरावीचे वर्ग पूर्ण क्षमतेने सुरू होऊ शकलेले नसून, हजारो विद्यार्थी शिक्षणापासून वंचित राहिले आहेत. त्यामुळे विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान झाल्याचे मत महाराष्ट्र राज्य शिक्षण संस्था महामंडळ,


पुणेचे उपाध्यक्ष अशोकराव थोरात यांनी व्यक्त केले आहे.

याविषयी गंभीर चिंता व्यक्त करताना श्री. थोरात म्हणाले, विद्यार्थी व पालक हितासाठी किमान १ ऑगस्टपासून वर्ग सुरू होणे आवश्यक होते. मात्र आजअखेरही प्रवेश रखडल्यामुळे ग्रामीण व शहरी भागातील हजारो विद्यार्थी शिक्षणप्रवाहातून बाहेर पडले आहेत. ग्रामीण व निमशहरी भागात ऑनलाईन प्रवेश प्रक्रिया बंद केल्याशिवाय हे नुकसान थांबणार नाही.

या संदर्भात श्री. थोरात यांनी मुख्यमंत्री, शिक्षणमंत्री, शिक्षण राज्यमंत्री, शिक्षण आयुक्त, संचालक व शिक्षणाधिकारी यांच्याकडे लेखी मागणी केली होती. परंतु, शासनाने त्याला प्रतिसाद दिला नसल्याचे त्यांनी सांगितले. राज्यातील अनेक अनुदानित व विना-अनुदानित तुकड्या अद्याप रिक्त आहेत. अकरावी ऑनलाईन प्रवेश प्रक्रियेतील गोंधळ व विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक नुकसानीस जबाबदार कोण? शासनाला ग्रामीण, शहरी गरीब, शेतकरी, मागासवर्गीय व आदिवासी मुलांना शिक्षण द्यायचे नाही का? असे थेट प्रश्न श्री. थोरात यांनी शासनाला विचारले आहेत.

तसेच प्रवेश न मिळाल्यामुळे मोठ्या प्रमाणावर विद्यार्थ्यांत असंतोष निर्माण झाला असून, शासनाने तातडीने या प्रश्नाकडे लक्ष देणे अत्यावश्यक असल्याचे श्री. थोरात यांनी स्पष्ट केले.


सातारा : पोवईनाका येथे शिवतीर्थावर जल्लोष करताना मराठा बांधव.

# साताऱ्यात शिवतीर्थावर जल्लोष

**सातारा / प्रतिनिधी:**
मराठा आरक्षणाच्या प्रश्नावर राज्य सरकारने घेतलेल्या सकारात्मक निर्णयाचे स्वागत सातारा शहरातील मराठा समाजाच्या कार्यकर्त्यांनी उत्साहात केले. मंगळवारी सायंकाळी शिवतीर्थ येथे छत्रपती शिवाजी महाराजांच्या स्मारकास पुष्पहार अर्पण करून जल्लोष साजरा करण्यात आला. सायंकाळी साडेसहाच्या सुमारास कार्यकर्ते मोठ्या संख्येने शिवतीर्थावर जमा झाले. ''एक मराठा लाख मराठा'' अशा गगनभेदी घोषणा देत त्यांनी सरकारच्या निर्णयाचे स्वागत केले. कार्यकर्त्यांनी एकमेकांना पेढे भरवून आनंद व्यक्त केला.

या जल्लोषात शरद काटकर, शरद जाधव, बापू क्षीरसागर, ड. शिर्के, बंडू कदम यांच्यासह मराठा समाजातील मान्यवर उपस्थित होते.

यावेळी कार्यकर्त्यांनी विशेषत: मंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले यांचे आभार मानले. मराठा आरक्षणाच्या प्रश्नावर त्यांनी घेतलेली सकारात्मक भूमिका आणि सातत्याने केलेला पाठपुरावा यामुळेच सरकारने निर्णय घेतल्याचे कार्यकर्त्यांचे मत होते. शिवतीर्थावर संध्याकाळभर ढोल-ताशांचा गजर, घोषणाबाजी आणि कार्यकर्त्यांचा उत्साह दिसून आला. मराठा आरक्षणाच्या दिशेने सरकारकडून उचललेले पाऊल हा समाजासाठी ऐतिहासिक क्षण असल्याचे मतही व्यक्त करण्यात आले.

# पुसेसावळीत साकारली अवयवदान जनजागृती विषयक सजावट

## काशीद कुटुंबियांची 'अवयवदान गणेश सजावट' चर्चेत; वैद्यकीय मदत, विविध आरोग्य योजनांचे सादरीकरण

**पुसेसावळी/प्रतिनिधी : -**
अवयवदान, वैद्यकीय मदत व विविध शासकीय आरोग्य योजनांची जनजागृती शासन, सामाजिक संस्था यांच्यामाध्यमातून करण्यात येते. नुकताच शासनाच्या वतीने अवयवदान जनजागृतीच्या उद्देशाने अवयवदान पंधरावडाही संपन्न झाला. परंतु, ग्रामीण भागात अजुनही लोकांच्यात अवयवदान व वैद्यकीय मदत याबाबत गैरसमज असून, पुसेसावळी, ता. खटाव येथील अविनाश काशीद व कुटुंबियांनी गणेशोत्सवाच्या माध्यमातून अवयवदान जनजागृती, वैद्यकीय मदत व संकल्प निरोगी महाराष्ट्राचा अंतर्गत विविध आरोग्य योजनां विषयी जनजागृती करण्याचा प्रयत्न केला आहे. या विशेष सजावटीची सध्या पुसेसावळी परिसरात मोठी चर्चा होत आहे.

> गणेशोत्सवाच्या माध्यमातुन अविनाश काशीद व कुटुंबियांनी अवयवदान जनजागृती व वैद्यकीय मदत व शासकीय आरोग्य योजना जनजागृती साठी केलेला प्रयत्न कौतुकास्पद उपक्रम असुन यामुळे ग्रामीण भागातील गरजू रुग्णांना मदत व मार्गदर्शन मिळण्यास निश्चितच मदत होईल.
>
> - मंगेश चिवटे
>
> (कक्ष प्रमुख, उपमुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता कक्ष)

आंतरराष्ट्रीय भरड धान्य वर्षानिमित्त भरडधान्य गणेश यातुन भरडधान्य प्रकार व पोषणमूल्य व उपयुक्तता, पर्यावरण पुरक गणेश, लेक वाचवा व साक्षरता, सेंद्रीय शेती उत्पादने काळाची गरज, आयुर्वेद सर्वांसाठी, पंचगव्य गणेश, ग्रामीण संस्कृती आदी संकल्पनावर यापूर्वी काशीद कुटुंबियांनी आकर्षक सजावटी साकारल्या असुन हे सजावटीचे सलग आठवे वर्ष आहे.

सजावटीमधे अवयवदाता (आय एम ऑर्गन डोनर) रुपातील प्रतिकात्मक गौराई, अवयवदान विषयक अवयवदान म्हणजे नक्की काय? का करावे, कुणी करावे, कोण करु शकतो, जीवंतपणी - मृत्युपश्चात - ब्रेन डेथ झाल्यानंतर, अवयवदान शस्त्रक्रिया शासन नियमावली, अवयव प्रत्यारोपण समिती व वैद्यकीय मदत याविषयी सविस्तर माहितीपर पोस्टर्स, पुस्तके, अवयवदान नोंदणीसाठी शासनाच्या नोट्टो संस्थेचा क्युआर कोड, नेत्रदान पंधरावडा, वैद्यकीय मदत अंतर्गत पंतप्रधान व मुख्यमंत्री/उपमुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता कक्ष सविस्तर माहिती, वैद्यकीय मदत मार्गदर्शक पुस्तिका, राष्ट्रीय आरोग्य योजना, महात्मा फुले व आयुष्यमान भारत-जन आरोग्य योजना, प्रधानमंत्री मातृवंदना योजना, आयुष्यमान कार्ड-आयुष्यमान वयवंदना, विविध धर्मादाय ट्रस्ट यांसह संकल्प निरोगी महाराष्ट्राचा अंतर्गत आरोग्य विभागाच्या सर्व आरोग्य योजना, तसेच थॅलेसेमिया, कर्करोग, क्षयरोग, व्यसनमुक्ती, सुरक्षित मातृत्व-सुमन, बालकांचे लसीकरण याविषयी सविस्तर माहिती पोस्टर्सद्वारे मांडण्यात आली आहे.


पुसेसावळी : गणेशोत्सवाच्या माध्यमातून अवयवदान, वैद्यकीय मदत व आरोग्य योजनांविषयी पोस्टर्सद्वारे जनजागृती.

या सजावटीस अनेक नागरिक, युवा मंडळे, वैद्यकीय व्यावसायिक यांनी भेट देऊन या ऊपक्रमाचे कौतूक करुन या माध्यमातून निश्चितच अवयवदान जनजागृती साठी प्रयत्न होतील, अशी आशा व्यक्त केली.

### अवयवदान जनजागृतीसाठी प्रयत्न

अवयवदान जनजागृती या विषयावर विविध माध्यमांत अविनाश काशीद यांचे गेल्या नऊ वर्षात शंभरहून अधिक लेख प्रसिध्द झाले असुन अवयवदान शस्त्रक्रिया व गरजु रुग्णांना मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता कक्षाचे संकल्पक मंगेश चिवटे यांच्या मार्गदर्शनाखाली दीड कोटी हून अधिक रुपयांची मदत विविध शासकीय योजना व धर्मादाय संस्थामधुन श्री.काशीद यांनी निशुल्कपणे मिळवुन दिली आहे.